**ठळक बातम्या**

- अन्नपदार्थ भेसळीच्या तक्रारींबाबत सरकार तातडीनं कडक कारवाई करत असल्याची अन्न आणि नागरी पुरवठा मंत्र्यांची लोकसभेत ग्वाही

- महाराष्ट्रात तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय सरकारने मागे घेतला

- केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे बूथ पातळीवरच्या देशभरातल्या एक लाख अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्गाला प्रारंभ

- बलात्काराच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यासंदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वादग्रस्त आदेशाला सर्वोच्च न्यायालयानं दिली स्थगिती

**आणि**

- छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात ९ नक्षली अतिरेक्यांची शरणागती

**<><><><><>**

अन्नपदार्थांमध्ये भेसळीबाबतच्या तक्रारींबाबत सरकार तातडीनं कडक कारवाई करत असल्याची ग्वाही अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात दिली. अशा तक्रारी दाखल होताच त्याची चौकशी करून हे अन्नपदार्थ खाण्यायोग्य नसल्याचं आढळल्यास संबंधितांवर सरकार फौजदारी कारवाई करत असल्याचं जोशी यांनी नमूद केलं. विविध अन्नपदार्थांच्या चाचणीसाठी देशभरात एफ एस एस ए आयच्या २४२ प्रयोगशाळा तसंच चालत्या प्रयोगशाळाही कार्यरत असल्याचं त्यांनी सांगितलं. भेसळयुक्त अन्नपदार्थांबाबत जागृती निर्माण करण्यासाठी सरकार समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असल्याची माहिती त्यांनी दिली. आणखी एका

प्रश्नाला उत्तर देताना, राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन, ग्राहक सुरक्षेत मोठी भूमिका बजावत असल्याचं जोशी यांनी नमूद केलं.

<><><><><>

सुरक्षितता ही देशाच्या अणुऊर्जा धोरणाची गुरुकिल्ली असून मोदी सरकार, 'प्रथम सुरक्षितता आणि त्यानंतर उत्पादन' या नियमाचं पालन करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी आज लोकसभेत केलं. सरकारनं २०३१-३२ पर्यंत सध्याच्या आठ हजार १८० मेगावॅटवरून २२ हजार ४८० मेगावॅट पर्यंत अणुऊर्जा क्षमता वाढवण्यासाठी पावलं उचलली असल्याचं सिंह यांनी प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना सांगितलं.

<><><><><>

देशातल्या सर्व व्यवस्था एकमेकांवर अर्थपूर्ण नियंत्रण ठेवण्यासाठी तयार झाल्या असून त्यांनी आपपलं काम चोखरीतीने केलं पाहिजे असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज राज्यसभेत सांगितलं. दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या घरी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आढळल्याप्रकरणी उपराष्ट्रपतींनी सभागृह नेते आणि विरोधी पक्ष नेते यांची  नुकतीच एक बैठक घेतली होती. त्यासंदर्भात ते बोलत होते.

<><><><><>

तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय सरकारने घेतला होता, मात्र मंत्रिमंडळात यावर चर्चा होऊन असा कर लावण्याची गरज नाही असा निर्णय झाला. त्यामुळे हा कर लावला जाणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगितलं. सर्व सरकारी वाहनं तसंच मंत्र्यांची वाहनं टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक करण्यात येतील असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. आमदारांना यापुढे फक्त इलेक्ट्रिक वाहनांसाठीच कर्ज दिलं जाईल असंही त्यांनी सांगितलं.

यूपीएससीसीच्या धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून अण्णा बनसोडे यांची नियुक्ती झाल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज केली. या पदासाठी बनसोडे यांचा एकमेव अर्ज आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आणि सर्व सदस्यांनी एकमताने त्याला मंजुरी दिली. बनसोडे हे आमदार म्हणून तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.

उत्तराखंडमध्ये झालेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, नवी दिल्लीत झालेल्या खोखो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरुष संघाने मिळवलेले अजिंक्य पदक, आशियाई कबड्डी स्पर्धेत भारतीय महिला संघाने मिळवलेलं विजेतेपद आणि रणजी क्रिकेट स्पर्धेत विदर्भाने मिळवलेल्या विजयाबद्दल विधानसभेने अभिनंदनाचा प्रस्ताव एकमताने मंजूर केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रस्ताव मांडला आणि सभागृहाने तो एकमताने मंजूर केला. विधानपरिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा प्रस्ताव मांडला. सभागृहाने तो एकमताने मंजूर केला.

दिशा सालियन हिच्या मृत्यूप्रकरणी आदित्य ठाकरे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी शिवसेनेच्या संजय गायकवाड यांनी सभागृहात केली. त्यानंतर सत्तारूढ पक्षाचे सदस्य आक्रमक झाले, गदारोळ झाल्यामुळे कामकाज दहा मिनिटं तहकूब करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी याप्रकरणी तपासात सहकार्य करुन कोणालाही पाठीशी घालणार नाही, असं सांगितलं.

<><><><><>

निवडणूक आयोगातर्फे बूथ पातळीवरच्या एक लाख अधिकाऱ्यांसाठी प्रथमच प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे. नवी दिल्लीत आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त विवेक जोशी यांच्या हस्ते झालं. बिहार, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ,पुद्दुचेरी आणि तमिळनाडूमधल्या १३ जिलह्यांमधले निवडणूक नोंदणी अधिकारी आणि निवडणूक अधिकारी यांच्यासह १०० हून जास्त बूथ पातळीवरचे अधिकारी या टप्प्यात प्रशिक्षण घेणार आहेत.

<><><><><>

अभिनेत्री रुही सिंग यांना इंडियन कॉमिक्स असोसिएशनची प्रादेशिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे आणि त्या वेव्हज २०२५ या कार्यक्रमात असोसिएशनचं प्रतिनिधित्व करणार आहेत. क्रिएट इन इंडिया अंतर्गत वेव्हज २०२५ परिषदेची अंतिम फेरी येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

<><><><><>

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या बलात्काराच्या प्रयत्नाच्या गुन्ह्याशी संबंधित वादग्रस्त आदेशाला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून दखली घेतली आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठानं उच्च न्यायालयाच्या या मतांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आणि हा आदेश धक्कादायक असल्याचं नमूद केलं. या आदेशाच्या काही भागात संबंधित न्यायाधीशांची असंवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येत आहे आणि हे अतिशय वेदनादायी आहे, असंही खंडपीठानं म्हटलं आहे.

<><><><><>

देशभरातल्या सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतले धान्य व्यापारी , अडते आणि प्रक्रियाकर्त्यांनी त्यांच्याकडचा गव्हाचा साठा येत्या एक एप्रिलपासून दर

आठवड्याला सरकारच्या ऑनलाईन पोर्टलवर जाहीर करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. देशातली अन्न सुरक्षा राखण्यासाठी आणि बाजारभावातले चढउतार नियंत्रित करण्यासाठी आखलेल्या सर्वसमावेशक धोरणाला अनुसरून हा आदेश दिला असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आर्थिक यंत्रणा सुरक्षित ठेवण्यासाठी धोरणकर्त्यांनी केलेले नियम आणि उचललेल्या पावलांमुळे कायद्याला धरून होणाऱ्या कामांमध्ये अडथळे निर्माण होता कामा नयेत, असं झाल्यास हे आर्थिक समावेशनाच्या दृष्टीने हानीकारक ठरू शकतं, असं प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज केलं. फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सच्या खासगी क्षेत्र सहकार्य मंच २०२५च्या उद्घाटनप्रसंगी ते आज मुंबईत बोलत होते. भारतानं आर्थिक समावेशनात चांगली प्रगती केली असून आता ९४ टक्के सज्ञान नागरिकांचं बँकेत खातं आहे, ही बाब त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज ९ नक्षली अतिरेक्यांनी शरणागती पत्करली. त्यात ६ महिलांचा समावेश आहे. या सर्वांवर मिळून २६ लाख रुपयांचं बक्षीस होतं आणि अनेक हिंसक घटनांमधे त्यांचा हात होता. वरिष्ठ पोलीस आणि सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर त्यांनी शरणागती पत्करली.

**<><><><><>**

दक्षिण कोरियाच्या आग्नेय भागात लागलेल्या वणव्यामुळे किमान १८ जणांचा मृत्यू झाला तर १९ जण जखमी झाले आहेत. सुमारे २३ हजारांहून अधिक जणांना बाहेर काढण्यात आलं असून शेकडो इमारतींचं नुकसान झालं आहे. अनेक वारसास्थळांचंही या वणव्यामुळे नुकसान झालं असून त्यात तेराशे वर्षं जुन्या बौद्ध मंदिराचाही समावेश आहे. वणवा आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे

हजारो जवान आणि पाच हजार लष्करी कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या वणव्यामुळे दक्षिण कोरियाचं १७ हजार हेक्टर परिसरातलं जंगलही नष्ट झालं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज राजस्थान रॉयल्स आणि कोलकत्ता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. गुहाहाटी इथल्या बरसापारा स्टेडियम इथं हा सामना खेळाला जाणार आहे. आज संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल. काल अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियम इथं खेळल्या गेलेल्या सामन्यात  पंजाब किंग्स संघानं गुजरात टायटन्स संघावर ११ धावांनी विजय मिळवला. पंजाब किंग्स संघानं केलेल्या २४४ धावांचा पाठलाग करताना गुजरात संघ वीस षटकात  ५ बळी गमावून केवळ २३२ धावाच करू शकला.

**<><><><><>**

सहा हजार कोटी रुपयाच्या महादेव ॲप प्रकरणी छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या रायपूर आणि भिलाई इथल्या घरांवर आज सीबीआयने छापा टाकला. त्याखेरीज ४ आयपीएस अधिकाऱ्यांसह ७ पोलीस अधिकाऱ्यांच्या घरांवरही छापा टाकला. बघेल यांच्या निकटवर्तियांच्या घरं आणि आस्थापनांवरही  झडती सत्र राबवण्यात आलं.

**//<><><><><>//**